**नियमीत दिवाणी दावा क्र.२०४/२०२५ मध्ये निशाणी ३१ वरील आदेश**

०१. सदरचा अर्ज हा वादीने कैफियत व जबाब देण्यासाठी झालेला विलंब माफ होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांनी निशाणी २६ अन्वये दाखल केलेल्या प्रतिदाव्यामध्ये वादीने मे.कोर्टात मुदतीत कैफियत व जबाब दाखल करणे आवश्यक होते. परंतु वादीकडे आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्याने वादीतर्फे मुदतीत प्रतिदाव्यास कैफियत व जबाब दाखल केलेला नाही. सदर दाव्यात वादीला कैफियत व जबाब दाखल करणेस साधारणपणे ३४ दिवसाचा विलंब झालेला आहे. वादीला झालेला उशीर हा हेतुपुरस्कर केलेला नाही. न्यायाच्या दृष्टीने झालेला उशीर माफ होवुन मिळणे आवश्यक व गरजेचे आहे. वादीची कैफियत व जबाब दाखल करून घेण्यास मे.कोर्टामार्फत परवानगी दिल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीला जबाब व कैफियत दाखल करण्यास झालेला ३४ दिवसांचा विलंब माफ होवुन प्रतिदाव्यास कैफियत व जबाब दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी नं.१ व २ यांनी सदरच्या अर्जाच्या मागे त्यांचे म्हणणे दिले आहे. त्यामध्ये सदरचा वादी यांचा अर्ज हा मोघम स्वरूपाचा असुन कोणतेही संयुक्तीक कारण विलंबास दिलेले नाही. वादी यांना प्रतिवादीचे प्रतिदाव्यास कैफियत जबाब दाखल करण्यास पुरेशी संधी देण्यात आलेली असुन केवळ प्रतिवादीचे प्रतिदाव्याचे कामकाज लांबणीवर पाडणेकामी अर्जास जबाब दाखल व कैफियत दाखल करण्यास टाळाटाळ केलेली आहे. तरी मे. कोर्टाच्या आदेशान्वये योग्य तो हुकुम व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. वादी व प्रतिवादी नं.१ व २ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व पटलावरील कागदपत्र यांचे अवलोकन केले.

०५.		प्रस्तुत दाव्यात वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी निशाणी २६ अन्वये दाखल केलेल्या प्रतिदाव्यामध्ये वादीने मे.कोर्टात मुदतीत कैफियत व जबाब दाखल करणे आवश्यक होते परंतु वादी यांचेकडे आवश्यक कागदपत्र उपलब्ध न झाल्याने वादीस मुदतीत प्रतिदाव्यास कैफियत जबाब दाखल करता आला नाही. प्रस्तुत दाव्यात वादीने प्रस्तुत अर्जासोबत तिचे प्रतिज्ञापत्र निशाणी ३२ वर दाखल केलेले त्यामधील तिने नमुद केलेले कारण संयुक्तिक असल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादीस प्रतिदाव्यास कैफियत जबाब दाखल करण्यास झालेला ३४ दिवसांचा विलंब माफ होवुन मिळणे आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्याचा गुण व दोषांवर निकाल लागण्याकरिता वादीस प्रतिदाव्यास कैफियत व जबाब अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादींचा वाया गेलेला वेळ हा खर्चाने भरून काढता येउ शकतो. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**—:: <u>आदेश</u> ::—**

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. वादीला प्रतिदाव्यास कैफियत व निशाणी २६ अन्वये दाखल केलेल्या प्रतिदाव्यामध्ये कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला ३४ दिवसांचा विलंब माफ करण्यात येत आहे.

०३. वादीने प्रतिवादींना रक्कम रू. ५००/— इतका खर्च द्यावा.

०४. वादीने प्रतिवादींना खर्च दिल्यास प्रतिवादी यांनी निशाणी २६ अन्वये दाखल कलेल्या प्रतिदाव्यास कैफियत व जबाब पटलावर घेण्यात येईल.

VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN
Digitally signed by VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN
Date: 2026.04.28 15:18:56 +0530

**( व्ही. बी. चव्हाण )**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— २८/०४/२०२६.